8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही; शासन सर्वोतोपरी मदत करणार : महसूलमंत्री बावनकुळे

**जालना - प्रतिनिधी**

**यंदाच्या खरीप हंगामात अपेक्षेप्रमाणे पाऊस न झाल्याने तसेच पावसाचे प्रदीर्घ खंड पडल्यामुळे जालना जिल्ह्यासह राज्यातील अनेक भागांमध्ये शेतीपिकांवर मोठा परिणाम झाला आहे. पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली असून अनेक भागांत पिके करपल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी जालना जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करून पीक परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली. बदनापूर तालुक्यातील वरुडी तसेच भोकरदन तालुक्यातील दगडवाडी शिवारात त्यांनी शेतांमध्ये जाऊन पिकांची पाहणी केली आणि शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. नैसर्गिक संकटामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाकडून सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.**




## बदनापूर तालुक्यातील वरुडी, भोकरदनमधील दगडवाडी शिवारात पीक परिस्थितीची पाहणी; शेतकऱ्यांशी संवाद साधून जाणून घेतल्या अडचणी

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्यांच्या नुकसानीच्या प्रमाणात अधिकाधिक मदत मिळावी, यासाठी शासनाची भूमिका सकारात्मक असून प्रशासनाला आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, अशी ग्वाही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी दिली.

**पावसाच्या खंडाचा पिकांना मोठा फटका**

जालना जिल्ह्यात यंदा पावसाचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी राहिले. त्यातच पावसाने दीर्घकाळ खंड दिल्यामुळे खरीप हंगामातील सोयाबीन, कापूस, मूग, उडीद, तूर यांसह विविध पिकांवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी पिकांची वाढ खुंटली असून उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. वरुडी आणि दगडवाडी शिवारातील पाहणीदरम्यान महसूलमंत्र्यांनी शेतकऱ्यांकडून पिकांची सद्यस्थिती, झालेला खर्च, अपेक्षित उत्पादन आणि पावसाच्या अभावामुळे झालेल्या नुकसानीची माहिती घेतली. शेतकऱ्यांनी आपापल्या अडचणी महसूलमंत्र्यांसमोर मांडल्या.

**नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे**

राज्य शासनाने दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आवश्यक त्या उपाययोजना सुरू केल्या असून नुकसानग्रस्त शेतपिकांचे तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. त्यानुसार संबंधित विभागांकडून पंचनाम्याचे काम सुरू झाले आहे. पंचनाम्याच्या माध्यमातून प्रत्यक्ष नुकसानीची नोंद *(पान २ वर)*

## ध्वनिप्रदूषण रोखण्यासाठी शांतता क्षेत्र घोषित करा, १२ ऑक्टोबरला सुमोटो सुनावणी: अ‍ॅड. महेश धनावत

**जालना - प्रतिनिधी**

ध्वनिप्रदूषणाच्या वाढत्या समस्येची गंभीर दखल घेत अलाहाबाद उच्च न्यायालयाने स्वतःहून (सुमोटो) जनहित याचिका दाखल करून घेतली आहे. उत्तर प्रदेशातील बलरामपूर येथील एका शाळेजवळून जाणाऱ्या मिरवणुकीतील कानठळ्या बसवणाऱ्या ध्वनिक्षेपकाच्या आवाजामुळे इयत्ता दुसरीतील चिमुरड्या विद्यार्थिनीचा वर्गखोलीतच मृत्यू झाल्याच्या कथित घटनेनंतर न्यायालयाने हे कठोर पाऊल उचलले आहे. न्यायमूर्ती राजन रॉय आणि न्यायमूर्ती मंजीव शुक्ला यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, रस्त्यांवर दररोज ध्वनी नियमांचे उल्लंघन होत असून ध्वनिप्रदूषण आता मानवी जीवनासाठी एक मोठा उपद्रव ठरत आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी बारा ऑक्टोबर रोजी होणार आहे.

पर्यावरण संरक्षण कायदा आणि ध्वनीप्रदूषण नियम लागू असतानाही त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याबद्दल न्यायालयाने तीव्र चिंता व्यक्त केली. नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी नियमित *(पान २ वर)*

## दुष्काळसदृश परिस्थितीत शेतकऱ्यांना प्रशासनाचा आधार

### जिल्ह्यातील ८६० गावांत ‘शेतकरी संवाद सभा’ संपन्न; अडचणी जाणून घेत योजनांची दिली माहिती

**जालना - प्रतिनिधी**

दुष्काळसदृश परिस्थितीमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आणि त्यांच्या समस्या थेट जाणून घेण्यासाठी जिल्ह्यातील ८६० गावांमध्ये ‘शेतकरी संवाद सभा’ घेण्यात आल्या. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या सूचनेनुसार राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून प्रशासनाने गावपातळीवर शेतकऱ्यांशी थेट संवाद साधण्यात आला. दुष्काळसदृश



परिस्थितीत शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांची माहिती घेण्यासोबतच शासनाच्या मदत व कल्याणकारी योजनांची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचविणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी आणि गटविकास अधिकाऱ्यांनी नियोजन करून या सभा घेतल्या. सभांमध्ये शेतकऱ्यांना पीक नुकसान भरपाई, चारा उपलब्धता तसेच दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या अडचणी, स्थानिक गरजा आणि प्रलंबित प्रश्न जाणून घेण्यासाठी अधिकाऱ्यांनी त्यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा *(पान २ वर)*



जालना - शेरी स्मशानभूमी ट्रस्ट, जालना यांच्या सचिवपदी श्री. अजय रोडिया यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले व त्यांच्या पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी महाराष्ट्र राज्य पंचायत राज समितीचे अध्यक्ष आ. संतोष पाटील दानवे, भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, परमपूज्य श्री. चंदन महाराज मिश्रा, भाजपा जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, भाजपा किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सतीश केरकळ, भाजपा पूर्व मंडळ अध्यक्ष सुनील खरे, देविदास देशमुख, राजेश जोशी, राहुल यादव आदीची उपस्थित होते.

## पुस्तकांशी मैत्री करा, मनोरंजनासोबत भरपूर ज्ञान मिळेल-सौ. रेखाताई बैजल

**जालना - प्रतिनिधी**

टीव्ही आणि मोबाईलच्या विश्वात वेळ घालवण्यापेक्षा पुस्तकांना आपला खरा सोबती बनवा. वाचनामुळे केवळ भरपूर मनोरंजनच होत नाही, तर ज्ञानाची नवी दिशा मिळते. या अनुकूल वातावरणाचा आणि ‘वाचन कट्टा’ उपक्रमाचा पुरेपूर लाभ घेऊन प्रत्येकाने जीवनात खूप मोठे व्हावे, असे प्रेरक आवाहन प्रसिद्ध लेखिका तथा राय लक्ष्मणप्रसाद बैजल ट्रस्टच्या उपाध्यक्ष रेखाताई बैजल यांनी केले.



जालना एज्युकेशन फाउंडेशन व राय लक्ष्मणप्रसाद बैजल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने सरस्वती भुवन प्राथमिक विद्यालयात शालेय विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या ‘वाचन कट्टा’ या अभिनव उपक्रमाचे उद्घाटन बुधवार दि. ३० सप्टेंबर रोजी बैजल ट्रस्टचे सचिव अ‍ॅड. विष्णुपंत नाईक यांच्या हस्ते झाले, त्याप्रसंगी रेखाताई बोलत होत्या. व्यासपीठावर ट्रस्टचे अध्यक्ष शिवकुमार बैजल, सरस्वती भुवन माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक मधुकर बिरहारे, जालना एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी, मार्गदर्शक प्रा. ओमप्रकाश झांजरी आणि प्रकल्प समन्वयक रुक्मिणीकांत दीक्षित उपस्थित होते.

विद्यार्थ्यांशी संवाद साधताना रेखाताई बैजल यांनी अत्यंत ओघवत्या आणि आत्मीय शैलीत बालपणीचे दिवस उलगडले. त्या म्हणाल्या, तुमच्यासारखी गोड मुले पाहिली की मला साठ वर्षांपूर्वीचे माझ्या शाळेचे दिवस आठवतात. कंदिलाच्या उजेडात केलेला अभ्यास आणि त्यावेळच्या कौलारू शाळांची आठवण आजही ताजी आहे. आमच्या वेळी टीव्ही नव्हता. शाळेतून मिळणारी इसापनीती, सिंहासन बत्तीशी अशी छान गोष्टींची पुस्तके वाचूनच आम्ही मोठे झालो. आज तुमच्याकडे उत्तम शाळा, सुंदर परिसर आणि उत्तम शिक्षक आहेत. त्यामुळे या सुवर्णसंधीचे सोने करून पुस्तकांशी मैत्री जोपासा.

रुक्मिणीकांत दीक्षित यांनी प्रास्ताविकातून उपक्रमाची रूपरेषा मांडली. ते म्हणाले, विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला *(पान २ वर)*

## ऊन, थकवा अन् खडतर रस्ता... सगळ्यावर मात करत कैलास झोळगे ठरले ४०० किमीचे बाहुबली!

**जालना - प्रतिनिधी**

अंगाची लाही लाही करणारे प्रचंड ऊन, रस्त्यांवरील आव्हानात्मक चढ-उतार आणि ४०० किलोमीटरचा प्रदीर्घ रस्ता... या सर्व प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शहरातील सायकलपटू कैलास झोळगे यांनी आंतरराष्ट्रीय दर्जाची मानली जाणारी एडॉक्स रेड रनर्स ४०० किमी बीआरएम मोहीम अवघ्या १८ तासांत यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. २७ सप्टेंबर रोजी आयोजित या खडतर मोहिमेत



त्यांनी आपल्या अफाट सहनशक्ती आणि कौशल्याची चुणूक दाखवून दिली.

असा होता आव्हानात्मक मार्ग

या सायकल मोहिमेची आखणी अतिशय खडतर मार्गावर करण्यात आली होती. यामध्ये खुलताबाद, दौलताबाद, झालता फाटा, संभाजीनगर-जालना रोड, अंबड चौफुली, वडीगोद्री, बीड आणि मांजरसुंबा अशा ऐतिहासिक व आव्हानात्मक टप्प्यांचा समावेश होता. मांजरसुंब्याहून परतीचा प्रवास करत संभाजीनगर येथील निराला बाजार या ठिकाणी अंतिम रेषेवर वेळेच्या आत पोहोचून त्यांनी ही मोहीम पूर्ण केली.

प्रचंड ऊन *(पान २ वर)*

## जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांना अभिवादन



**जालना - प्रतिनिधी**

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस प्र. तहसीलदार तुषार निकम यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी सहायक सहकार अधिकारी प्रल्हाद मोताळे, सहकार अधिकारी संजय खांडेभराड, किशोर तायडे, सुभाष मुंढे, विठ्ठल तुपसौंदर, मारोती अर्दड, दिपाली राऊत (वानखडे), रवी हेलगट, सुनिल काळुंके, अनिल हिवाळे उपस्थित होते.

## अमृतच्या शिष्यवृत्तीमुळे विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाला आर्थिक बळ

**जालना - प्रतिनिधी**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाचा खर्च कमी करण्यासाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थे कडून दिली जाणारी शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांसाठी मोठा आर्थिक आधार ठरत आहे. IIT, IIIT, AIIMS, IIM यांसारख्या नामांकित संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या पात्र विद्यार्थ्यांना दरवर्षी ₹१ लाख १० हजारांपर्यंत शिष्यवृत्ती मिळत असल्याने शिक्षण शुल्क, पुस्तके, शैक्षणिक साहित्य, निवास व इतर शैक्षणिक खर्चाचा भार कमी होण्यास मदत होत आहे.

खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना शासनाच्या स्वतंत्र विभाग, महामंडळ किंवा संस्थांच्या योजनांचा लाभ मिळत नाही, अशा जातींतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी अमृतची ही योजना महत्त्वाची ठरत आहे.

जालना येथील अक्षत भारूका हे सध्या IIT नागपूर येथे B.Tech प्रथम वर्षाचे शिक्षण




घेत असून, त्यांना या शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला आहे. तसेच हर्षवर्धन रुईखेडकर, साक्षी मालू, प्रांजल चिक्ची आणि विराज सोडानी या विद्यार्थ्यांनाही अमृतच्या शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला आहे.

याच बरोबर C-DAC, IGTR, NIELIT, उद्योग इंक्युबेशन योजना (Bhau/MSSU) या सारख्या उच्च शिक्षणाला मिळणाऱ्या आर्थिक मदतीमुळे विद्यार्थ्यांच्या कुटुंबावरील उच्च शिक्षणाचा आर्थिक भार कमी होऊन, गुणवंत विद्यार्थ्यांना शिक्षणावर अधिक लक्ष केंद्रित करता येत आहे. याच बरोबरआर्थिक अडचणींमुळे उच्च शिक्षणापासून कोणताही विद्यार्थी वंचित राहू नये, यासाठी अशा योजनांची भूमिका महत्त्वाची आहे. अमृतच्या शैक्षणिक व व्यावसायिक योजनांचा लाभ जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र युवक-युवतींनी घ्यावा, असे आवाहन अमृतचे जालना जिल्हा व्यवस्थापक नितीन खेकाळे यांनी केले आहे. अधिक *(पान २ वर)*

# संपादकीय...

## एसपी स्क्वॉडला छापा टाकावा लागतोय... मग स्थानिक पोलिस काय करत आहेत?

जालना जिल्ह्यात अवैध मटका आणि जुगार व्यवसायाविरोधात पोलिसांची कारवाई सुरू आहे. लिहा येथे एसपी स्क्वॉडने केलेली ताजी कारवाई त्याच मालिकेतील आणखी एक घटना आहे. छाप्यात ३९ हजार २२० रुपयांची रोख रक्कम आणि दोन मोबाईल असा ५५ हजार २२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधित व्यक्तीविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. कारवाई झाली, मुद्देमाल जप्त झाला, गुन्हा दाखल होईल आणि पोलिसांच्या विशेष पथकाचे कौतुकही होईल. पण या कारवाईनंतर एक अधिक मूलभूत प्रश्न उभा राहतोज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत मटका अड्डा सुरू होता, त्या पोलीस ठाण्याला त्याची माहिती का मिळाली नाही? हा प्रश्न एखाद्या अधिकाऱ्यावर थेट आरोप करण्यासाठी नाही; तर पोलीस व्यवस्थेतील उत्तरदायित्व तपासण्यासाठी विचारला पाहिजे. विशेष पथकाची कारवाई ही स्थानिक पोलिसांची सुटका नाही महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार पोलिसांचे मूलभूत कर्तव्य म्हणजे गुन्हे रोखणे, गुन्ह्यांची माहिती मिळवणे आणि कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे. यापेक्षाही महत्त्वाची बाब म्हणजे महाराष्ट्र पोलीस मॅन्युअलमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की एखाद्या विशिष्ट गुन्ह्याविरोधात विशेष पथक, अँटी-गॅम्बलिंग स्क्वॉड किंवा इतर विशेष शाखा कार्यरत असली, तरी त्यामुळे स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांची जबाबदारी संपत नाही. संबंधित पोलीस निरीक्षक आणि उपनिरीक्षकांनी माहिती मिळवणे, तिची पडताळणी करणे आणि विशेष पथकाला सहकार्य करणे अपेक्षित आहे. माहिती मिळवूनही कर्तव्य बजावले नाही, तर कर्तव्याकडे दुर्लक्षाची जबाबदारी निश्चित होऊ शकते, असे पोलीस मॅन्युअलमध्ये नमूद आहे. म्हणूनच प्रश्न असा आहे की, एसपी स्क्वॉडने कारवाई केली म्हणून विषय संपतो का? नाही. कारवाईनंतर त्या हद्दीतील स्थानिक पोलीस यंत्रणेनेही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. एखादा मटका अड्डा काही मिनिटांत उभा राहत नाही. त्यासाठी नियमित ग्राहक, व्यवहार, मोबाईलवरून संपर्क, रोख पैशांची देवाणघेवाण आणि विशिष्ट ठिकाणी सततची हालचाल असते. अशा परिस्थितीत एखाद्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा व्यवसाय सुरू असल्याची माहिती स्थानिक पोलिसांना पूर्णपणे नव्हती, असे प्रत्येक प्रकरणात गृहीत धरता येणार नाही. पण माहिती नव्हती की माहिती असूनही कारवाई झाली नाही, हा फरक तपासणे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे काम आहे. आणि हा फरक तपासल्याशिवाय प्रत्येक कारवाईनंतर केवळ आरोपीवर गुन्हा दाखल करून प्रकरण बंद करणे म्हणजे मूळ प्रश्नाला बगल देणे ठरेल. स्थानिक पोलिसांना मटका व्यवसायाची माहिती असूनही त्यांनी कारवाई केली नाही, यामागे कोणतेही गैरव्यवहाराचे किंवा आर्थिक हितसंबंध होते, असा निष्कर्ष पुराव्याशिवाय काढता येणार नाही. मात्र, वारंवार एखाद्या हद्दीत वरिष्ठांचे विशेष पथक कारवाई करत असेल, तर ''स्थानिक यंत्रणेची माहिती संकलन यंत्रणा कुठे कमी पडली?'', ''प्रतिबंधात्मक कारवाई का झाली नाही?'', ''पूर्वी तक्रारी किंवा गुप्त माहिती आली होती का?'', ''स्थानिक पोलिसांनी वरिष्ठांना अहवाल दिला होता का?'' हे प्रश्न विचारणे पूर्णपणे रास्त आहे. यासाठी आरोप नव्हे, तर वस्तुनिष्ठ विभागीय चौकशी हा मार्ग आहे. दोष आढळला तर कारवाईची तरतूद आहे महाराष्ट्र पोलिसांच्या शिस्तभंग नियमांनुसार पोलिस अधिकाऱ्याविरुद्ध गैरवर्तन किंवा कर्तव्यात कसूर सिद्ध झाल्यास विविध प्रकारच्या शिस्तभंगाच्या शिक्षा होऊ शकतात. त्यात तंबी, समज, वेतनवाढ रोखणे, सरकारला झालेल्या आर्थिक नुकसानीची वसुली, निलंबन, पद/वेतन कमी करणे, सक्तीची सेवानिवृत्ती, सेवेतून काढणे किंवा बडतर्फीपर्यंतच्या शिक्षांचा समावेश आहे. गंभीर शिक्षेसाठी विभागीय चौकशीची प्रक्रिया आवश्यक आहे. म्हणजेच ''एसपी स्क्वॉडने कारवाई केली म्हणून स्थानिक अधिकाऱ्यांना शिक्षा झालीच पाहिजे'', असा सरसकट नियम नाही. पण त्याचप्रमाणे ''स्थानिक अधिकाऱ्यांची काहीच जबाबदारी नाही'', असेही म्हणता येणार नाही. कारवाईच्या प्रत्येक घटनेत वस्तुस्थिती तपासून जबाबदारी निश्चित करता येते. जिल्हा पोलीस अधीक्षकांनी अशा कारवायांकडे केवळ गुन्हे उघडकीस आणण्याच्या दृष्टिकोनातून न पाहता प्रशासकीय उत्तरदायित्वाच्या दृष्टिकोनातूनही पाहण्याची वेळ आली आहे. एखाद्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत एसपी स्क्वॉडला मटका अड्डा सापडला तर संबंधित पोलीस ठाण्याकडून काही मूलभूत प्रश्नांची उत्तरे मागवली जाऊ शकतात. - या अड्ड्याची स्थानिक पोलिसांना माहिती होती का? - पूर्वी त्याबाबत तक्रार किंवा गुप्त माहिती आली होती का? - आली असल्यास कोणती कारवाई करण्यात आली? - बीट मार्शल किंवा बीट अधिकाऱ्याने त्या परिसराची पाहणी केली होती का? - संबंधित अधिकाऱ्यांनी वरिष्ठांना कोणती माहिती दिली? - यापूर्वी त्याच परिसरात अशाच प्रकारची कारवाई झाली होती का? - कारवाई टाळण्यात किंवा विलंब करण्यात कोणाची कसूर झाली का? या प्रश्नांची उत्तरे कागदोपत्री आणि तथ्यांच्या आधारे तपासली गेली पाहिजेत. मटका अड्ड्यावर छापा टाकून रोख रक्कम जप्त करणे ही कारवाईची सुरुवात आहे; शेवट नाही. आज एका ठिकाणी छापा पडतो. उद्या त्याच भागात दुसऱ्या नावाने पुन्हा अड्डा सुरू होतो. मग पुन्हा विशेष पथक येते. पुन्हा मुद्देमाल जप्त होतो. पुन्हा प्रसिद्धीपत्रक निघते. गुन्हेगार पकडणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच गुन्हा घडण्यापूर्वी तो रोखणे महत्त्वाचे आहे. मटका-जुगारासारख्या व्यवसायावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्थानिक पोलीस, गुप्तवार्ता यंत्रणा आणि वरिष्ठांचे विशेष पथक यांच्यात समन्वय आवश्यक आहे. महाराष्ट्र पोलीस स्वतः नागरिक सनदेत गुन्हे शोधणे आणि प्रतिबंध करणे हे पोलीस सेवेचे मूलभूत उद्दिष्ट असल्याचे नमूद करतात. प्रश्न मटका अड्ड्याचा नाही; प्रश्न पोलीस यंत्रणेच्या उत्तरदायित्वाचा आहे लिहा येथील कारवाईतील आरोपीवर कायदेशीर प्रक्रिया सुरू राहील. न्यायालयीन प्रक्रियेत दोष सिद्ध होईपर्यंत आरोपीबाबत कायदेशीर निष्पापत्वाची हमी लागू राहते. पण पोलीस प्रशासनासाठी या कारवाईतून वेगळा धडा घेण्याची गरज आहे. एसपी स्क्वॉडला एखाद्या हद्दीत जाऊन मटका अड्ड्यावर छापा टाकावा लागत असेल, तर त्या कारवाईनंतर त्या हद्दीतील स्थानिक पोलिसांच्या कामकाजाचेही परीक्षण झाले पाहिजे. दोष आढळला तर नियमानुसार कारवाई झाली पाहिजे. दोष आढळला नाही तर स्थानिक पोलिसांवरील संशयही दूर झाला पाहिजे.क रण जनतेला केवळ छापे नकोत; जनतेला गुन्हा होऊ न देणारी, पारदर्शक आणि उत्तरदायी पोलीस यंत्रणा हवी आहे. मटका अड्ड्यावर छापा ही बातमी आहे; पण त्या अड्ड्याची माहिती स्थानिक पोलिसांना का मिळाली नाही, हा प्रश्न व्यवस्थेच्या आरशात पाहण्याची वेळ आणणारा मुद्दा आहे.

# श्राद्धविधीमुळे श्राद्धकर्ता आणि त्याचे पूर्वज यांना आध्यात्मिक लाभ होतोका ?

गोवा - पिढ्यानपिढ्या, पितृपक्ष हा पूर्वजांचे (पितरांचे) स्मरण करण्याचा आणि त्यांच्यासाठी श्राद्धविधी करण्याचा काळ म्हणून ओळखला जातो. पूर्वजांच्या आध्यात्मिक कल्याणासाठी आणि सद्गतीसाठी केला जाणारा पारंपारिक श्राद्ध विधी तो करणाऱ्या व्यक्तीमध्ये आणि त्याच्या पूर्वजांमध्ये मोजता येण्याजोगे ऊर्जेतील बदल घडवून आणू शकतो का? महर्षि अध्यात्म विश्वविद्यालय, गोवा यांनी केलेल्या एका अभ्यासातून अत्यंत असाधारण निष्कर्ष समोर आले आहेत.

या अभ्यासात, चार श्राद्धकर्त्यांनी (त्यांच्या कुटुंबातील सदस्यांसह) त्यांच्या पितरांसाठी श्राद्ध विधी केला आणि दोन पुरोहितांनी विधी संपन्न केला. संशोधक पथकाने ऑरा अँड एनर्जी स्कॅनर (   ) चा वापर करून विधीपूर्वी आणि विधीनंतर श्राद्धकर्त्या व्यक्ती, पुरोहित आणि विधीतील घटकांच्या सूक्ष्म ऊर्जेच्या प्रभावळीच्या () नोंदी घेतल्या.

विशेष म्हणजे, चारही श्राद्धकर्त्यांमधील नकारात्मक ऊर्जेत सुमारे ५०% घट झाली आणि सकारात्मक ऊर्जेत सुमारे दुप्पट वाढ झाली. चौथ्या श्राद्धकर्त्याच्या पत्नीच्या नकारात्मक ऊर्जेच्या प्रभावळीत तब्बल ६०% घट झाली, तर तिची सकारात्मक ऊर्जेची प्रभावळ १००% हून अधिक वाढली. विधीमध्ये सहभागी झालेल्या पुरोहितांच्या सकारात्मक ऊर्जेच्या प्रभावळीत विधीनंतर सरासरी ५५% हून अधिक वाढ झाली. भगवान दत्तात्रेयांच्या (रक्षण करणारी आणि पितरांना गती देणारी देवता) प्रतिमेच्या




सकारात्मक ऊर्जेत विधीनंतर ४७% ची उल्लेखनीय वाढ दिसून आली.

संशोधकांनी विधीच्या घटकांमध्येही, उदा. पिंड, दर्भ आणि नैवेद्य यांमध्ये महत्त्वपूर्ण बदल नोंदवले. पितरांना अर्पण केलेले अन्न (पिंड - तीळ मिसळलेला भात) आणि दर्भ यांच्या नकारात्मक ऊर्जेत विधीनंतर अनुक्रमे २५ मीटर आणि १९ मीटरहून अधिक वाढ दिसून आली. देवांना दाखवलेल्या नैवेद्याच्या सकारात्मक ऊर्जेत श्राद्धानंतर १४४% एवढी थक्क करणारी वाढ झाली. एका पूर्वजांच्या छायाचित्रातील नकारात्मक ऊर्जेच्या प्रभावळीत ५४% घट झाल्याचे आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण झाल्याचे आढळले.

अशा उल्लेखनीय नोंदी या विधीच्या प्राचीन तरीही वैज्ञानिक आधाराची साक्ष देतात. श्राद्ध करणाऱ्या व्यक्तीलाच नव्हे, तर त्याच्या कुटुंबातील सदस्यांनाही आध्यात्मिक लाभ मिळतो. हा विधी जर भावपूर्ण (भाव ठेवून) केला तर मिळणारी सकारात्मक ऊर्जा अधिक असते.

भगवान दत्तात्रेय ही पितरांना गती देणारी देवता आहेत. श्राद्धाच्या ठिकाणी त्यांचे चित्र ठेवून त्यांची भावपूर्वक पूजा केल्याने त्यांचे तत्त्व कार्यरत होते;ज्याचा फायदा कुटुंबातील सर्व सदस्यांना होतो आणि पूर्वजांना त्यांच्या परलोकातील प्रवासात गती मिळते. मंत्रोच्चारासह पितरांना अर्पण केलेला पिंड त्यांना आकर्षित करतो व तृप्त करतो, ज्यामुळे त्यांना गती मिळण्यास मदत होते आणि त्यांच्यामुळे वंशजांना होणारा त्रास कमी होतो.

संशोधकांचा असा निष्कर्ष आहे की, श्राद्ध विधीमुळे विधी करणारे वंशज, त्यांचे कुटुंब, पुरोहित आणि पूर्वज या सर्वांना आध्यात्मिक लाभ मिळतो, जे हिंदू परंपरेतील या विधीचे आध्यात्मिक महत्त्व अधोरेखित करते. श्राद्धासोबतच, आध्यात्मिक लाभ वाढवण्यासाठी पितृ पंधरवड्यादरम्यान दररोज एक ते दोन तास ''ॐ ॐ श्री गुरुदेव दत्त ॐ'' हा नामजप करावा.

**सौ. मधुरा धनंजय कर्वे,**
**महर्षि अध्यात्म विश्वविद्यालय, गोवा**

# वंचित महिलांच्या सक्षमीकरणासाठी क्रांती संस्था व टाटा समूहाचा स्तुत्य उपक्रम

**परतूर - प्रतिनिधी**

पारधी आणि भटके-विमुक्त समाजातील भगिनींना केवळ अक्षरांची ओळख करून देऊन न थांबता, त्यांना थेट स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी क्रांती संस्था आणि टाटा समूहाने उचललेले हे पाऊल खऱ्या अर्थाने क्रांतिकारी आहे. शिक्षणामुळे विचारांना योग्य दिशा मिळते, तर हातातील कौशल्यामुळे जगण्याचे खरे बळ लाभते. वर्षभराच्या साक्षरता वर्गामुळे या महिलांमध्ये शिक्षणाची आवड आणि आत्मविश्वासाची नवी उमेद जागृत झाली आहे,'' असे परखड प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार भाऊसाहेब पाटील मुके यांनी केले. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून वर्षानुवर्षे वंचित राहिलेल्या पारधी व भटके-विमुक्त प्रवर्गातील महिलांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य, सन्मान आणि स्वाभिमान निर्माण करण्यासाठी क्रांती संस्था व टाटा डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने १० शिलाई मशीन उपलब्ध करून मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन व कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ पत्रकार भाऊसाहेब पाटील मुके यांनी भूषवले, त्यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना मुके म्हणाले की, ''शिलाई प्रशिक्षणाच्या माध्यमातून या भगिनी घरबसल्या अथवा स्वतःचा छोटा व्यवसाय सुरू करून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनू शकतील. जेव्हा कुटुंबातील स्त्री सक्षम होते, तेव्हा संपूर्ण कुटुंब आणि पुढची पिढी सक्षम होते. या महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना स्थानिक पातळीवर हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी पत्रकारिता आणि सामाजिक पातळीवरून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार राजकुमार भारूका, कैलास चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते सचिन काटे, क्रांती संघटनेचे राजेश थोरात तसेच टाटा पॉवरचे प्रतिनिधी करण चाटे, श्रेयस देवगिरी व प्रियवर्धक कुमार आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना सामाजिक कार्यकर्ते सचिन काटे म्हणाले की, ''उपेक्षित घटकांपर्यंत विकासाची फळे पोहोचवणे हे अत्यंत आव्हानात्मक काम असते; मात्र क्रांती संस्थेने सातत्यपूर्ण पाठपुरावा करून या महिलांमध्ये नवा विश्वास निर्माण केला आहे.

पान १ व ४ वरुन...

### दुष्काळाच्या संकटात...

घेऊन पात्र नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या निकषानुसार मदत उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळावी, यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

**'शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी शासन प्रयत्नशील'**

''यंदा कमी पाऊस आणि पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे राज्यातील अनेक भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीचा शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. राज्य शासन शेतकरी बांधवांना या नैसर्गिक संकटातून बाहेर काढण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अधिकाधिक मदत मिळावी, ही शासनाची भूमिका आहे,'' असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

राज्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला असून दुष्काळाचा सामना करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने विविध निर्णय घेतले असून प्रशासनाने त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देशही संबंधित यंत्रणांना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

**नागरिकांच्या समस्या ऐकून घेतल्या**

पीक पाहणीनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जालना येथील शासकीय विश्रामगृहात नागरिकांची भेट घेतली. विविध भागांतून आलेल्या नागरिकांनी आपल्या समस्या आणि मागण्यांची निवेदने महसूलमंत्र्यांकडे सादर केली. बावनकुळे यांनी नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

नागरिकांनी मांडलेल्या प्रश्नांबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून माहिती घेऊन आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. त्यामुळे महसूलमंत्र्यांच्या दौऱ्यादरम्यान पीक परिस्थितीच्या पाहणीसोबतच नागरिकांच्या विविध प्रश्नांवरही प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.

**लोकप्रतिनिधी व अधिकारी उपस्थित**

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पीक पाहणी दौऱ्यावेळी आमदार बबनराव लोणीकर, आमदार संतोष दानवे, आमदार नारायण कुचे, माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, बदनापूर उपविभागीय अधिकारी लता बागुल, भोकरदन उपविभागीय अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी कार्तिक पाणिग्रही, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे यांच्यासह महसूल व कृषी विभागातील अधिकारी, शेतकरी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

महसूलमंत्र्यांच्या प्रत्यक्ष पीक पाहणीमुळे जालना जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती, पिकांचे नुकसान आणि शेतकऱ्यांच्या अडचणी शासनाच्या निदर्शनास आणखी स्पष्टपणे आल्या आहेत. आता पंचनाम्यांची प्रक्रिया कितपत वेगाने पूर्ण होते आणि त्यानंतर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रत्यक्ष किती मदत मिळते, याकडे शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

### ध्वनिप्रदूषण रोखण्यासाठी...

देखरेख यंत्रणा उभारण्याची गरज असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

जिल्हाधिकाऱ्यांना ई-मेलद्वारे निवेदन; महाराष्ट्रावरही निर्णयाचा परिणामः ॲड. महेश धनावत

उच्च न्यायालयाच्या या महत्त्वपूर्ण भूमिकेनंतर महाराष्ट्रात, विशेषतः जालना जिल्ह्यातही या निर्णयाचे दूरगामी परिणाम जाणवणार आहेत. या पार्श्वभूमीवर जालना येथील विधीज्ञ ॲड. महेश धनावत यांनी जिल्हाधिकाऱ्यांना ई-मेलद्वारे लेखी पत्र पाठवून जिल्ह्यातील संवेदनशील परिसर तात्काळ शांतता क्षेत्र म्हणून घोषित करण्याची मागणी केली आहे.

ॲड. महेश धनावत यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पाठवलेल्या पत्रात व निवेदनात नमूद केले आहेः

''अलाहाबाद उच्च न्यायालयाने घेतलेली दखल अत्यंत स्वागतार्ह आणि डोळे उघडवणारी आहे. ध्वनिप्रदूषणाची समस्या महाराष्ट्रातही तितकीच गंभीर झाली आहे. जालना शहर व जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये, रुग्णालये आणि न्यायालयांच्या परिसराला प्रशासनाने विनाविलंब शांतता क्षेत्र म्हणून घोषित करावे. कोणत्याही राजकीय, धार्मिक किंवा जयंतीच्या मिरवणुकांमध्ये दणदणाट करणाऱ्या मोठ्या ध्वनिक्षेपकांना पूर्णपणे बंदी घातली पाहिजे. उत्सव आणि मिरवणुका यांच्या नावाखाली चिमुरड्यांच्या आणि नागरिकांच्या जिवाशी खेळण्याचा अधिकार कोणालाही नाही. प्रशासनाने कागदी नियमांच्या पलीकडे जाऊन तातडीने कारवाई करावी.''उच्च न्यायालयाच्या सुनावणीच्या पार्श्वभूमीवर आणि ॲड. धनावत यांनी ई-मेलद्वारे पाठवलेल्या पत्रानंतर जिल्हा प्रशासन आता शांतता क्षेत्रांची घोषणा करून मोठ्या आवाजाच्या यंत्रणांवर कधी अंकुश लावणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### दुष्काळसदृश परिस्थितीत...

केली. गावागावांत एकाचवेळी संवाद साधल्यामुळे जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीचा आणि शेतकऱ्यांच्या मागण्यांचा प्रशासनाला थेट आढावा घेता आला. शेतकऱ्यांनी मांडलेल्या समस्या व सभांमधून प्राप्त झालेल्या माहितीनुसार आवश्यक प्रशासकीय कार्यवाही आणि उपाययोजना करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

### पुस्तकांशी मैत्री करा...

आणि बुद्धीला वाचनामुळेच खरी धार येते. प्राथमिक स्तरावर वाचनाची सवय लागल्यास मुलांची ज्ञानाची कक्षा रुंदावते आणि व्यक्तिमत्त्व प्रगल्भ होते. हा वाचन कट्टा मुलांच्या बौद्धिक वाढीसाठी एक हक्काचे व्यासपीठ ठरेल.

सरस्वती भुवन प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विजया कुलकर्णी म्हणाल्या की डिजिटल युगात शाळेत असा वाचन कट्टा सुरू झाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची आवड वृद्धिंगत होत आहे. रेखाताईंचे विचार आणि ट्रस्टचे हे सहकार्य आम्हा सर्व शिक्षकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. परीक्षेच्या अवघ्या दोन महिन्यांपूर्वी पितृछत्र हरपल्यानंतरही न डगमगता, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जिद्दीने अभ्यास करून पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करणाऱ्या जैन प्राथमिक विद्यालयाचा आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थी आदित्य मसकर यास या कार्यक्रमात सौ. रेखा बैजल यांच्या हस्ते रोख पाच हजार रुपयांची आर्थिक मदत देऊन विशेष गौरव करण्यात आला. याप्रसंगी शाळेच्या शिक्षिका शुभांगी ढोबळे, संगीता बेरगुडे, मदतनीस सुलोचना वाघमारे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन विजया कुलकर्णी यांनी केले.

### ऊन, थकवा अन्...

आणि चढ-उतारांवर मात २७ सप्टेंबर रोजी प्रवासादरम्यान कडक उन्हाचा तडाखा आणि अनेक ठिकाणी असलेल्या तीव्र चढ-उतारांमुळे हा प्रवास अत्यंत थकवणारा ठरत होता. मात्र, कोणत्याही अडथळ्याला न घाबरता, योग्य पाण्याचे व आहाराचे नियोजन करत कैलास झोळगे यांनी अखंडपणे सायकल चालवणे सुरू ठेवले. शारीरिक थकव्यापेक्षा मनातील जिद्दीच्या बळावर त्यांनी ४०० किलोमीटरचे अवाढव्य अंतर अवघ्या १८ तासांच्या निर्धारित वेळेत पार केले. सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव बीआरएम सारख्या आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त सायकल स्पर्धेत ४०० किमीचे अंतर वेळेत पूर्ण करणे ही अत्यंत अभिमानास्पद बाब मानली जाते. कैलास झोळगे यांनी ३००किमी ,६००किमी सह आता ४००किमी मधे पोडियम फिशर्स ठरले आहेत यांच्या या अभूतपूर्व कामगिरीमुळे जालना क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण पसरले आहे. त्यांच्या या यशाबद्दल क्रीडाप्रेमी, मित्रपरिवार, तसेच विविध सायकलिंग ग्रुप्सकडून त्यांच्यावर कौतुक आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. आरोग्याविषयी जागरूकता आणि क्रीडा क्षेत्रातील तरुणांसाठी त्यांची ही कामगिरी अत्यंत प्रेरणादायी ठरणार आहे..

### अमृतच्या शिष्यवृत्तीमुळे...

.माहितीसाठी संपर्क : अमृत जिल्हा कार्यालय,दुसरा मजला, प्रशासकीय इमारत,जिल्हाधिकारी कार्यालय, जालना. मो. : ७३९१०६५४७४

### 'आदिशक्ती नौ...

मांडणी करण्यात आली असून, विविध सांस्कृतिक सादरीकरणातून देवीच्या नऊ रूपांचे वैशिष्ट्य आणि त्यामागील भावार्थ उलगडण्यात येणार आहे. शक्ती आणि भक्तीबरोबरच नारीच्या सामर्थ्याचा, तिच्या संघर्षाचा, ममतेचा आणि आत्मविश्वासाचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात येणार आहे. 'आदिशक्ती नौ रूप, एक स्वरूप' हा केवळ सांस्कृतिक कार्यक्रम नसून भारतीय परंपरा आणि संस्कृतीशी जोडणारा उपक्रम ठरणार आहे. देवीच्या रूपांचे सादरीकरण, संगीत, नृत्य आणि कलाविष्कार यांच्या माध्यमातून प्रेक्षकांना भक्तिमय वातावरणाचा अनुभव घेता येणार आहे.

नवरात्रीच्या काळात देवीच्या उपासनेसह भारतीय संस्कृतीतील विविध कलाप्रकारांचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. त्यामुळे समाजातील महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच कुटुंबांसाठी हा कार्यक्रम विशेष आकर्षणाचा ठरणार आहे.

अग्रवाल समाज जालना अंतर्गत अग्रशक्ती बहुमंडल २०२६च्या वतीने या कार्यक्रमाची तयारी करण्यात आली आहे. समाजातील नागरिकांनी तसेच जालन्यातील सांस्कृतिक रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

नवरात्रीच्या भक्तिमय वातावरणात 'आदिशक्ती नौ रूप, एक स्वरूप' या कार्यक्रमातून भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि नारीशक्तीचा अनोखा आविष्कार अनुभवण्याची संधी जालनेकरांना मिळणार आहे.

### समर्थ अकॅडमीत...

सौरभ आनंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महात्मा गांधी यांनी स्वच्छतेला दिलेले महत्त्व, स्वच्छ भारताची संकल्पना तसेच समाजाप्रती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. स्वच्छता ही केवळ शासनाची किंवा एखाद्या संस्थेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाने ती आपली सामाजिक जबाबदारी म्हणून स्वीकारली पाहिजे, असा संदेश यावेळी देण्यात आला. यानंतर गांधी जयंतीच्या अनुषंगाने अकॅडमी परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत परिसराची स्वच्छता केली. स्वच्छता मोहिमेद्वारे स्वच्छ परिसर, निरोगी जीवन आणि सामाजिक जबाबदारीचा संदेश देण्यात आला.

### गांधी जयंतीनिमित्त...

इंधनाची बचत तर होतेच, शिवाय वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यास मोठी मदत होते.

पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाचीच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची वैयक्तिक जबाबदारी आहे, असे नमूद करत नागरिकांनीही दैनंदिन आयुष्यात पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# मराठी अभिजात भाषा गौरव दिन–वाटचाल आणि सद्यस्थिती

आजचा दिवस मराठी भाषा आणि मराठीवर प्रेम करणा-यांसाठी सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवावा असा ऐतिहासिक क्षण आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर जगभरात, सातासमुद्रापार पोहचूनही तिथे मराठी भाषा, सणवार, उत्सव जोपासणा-यांसाठी एक गौरवाचा अभिमानास्पद दिवस आहे. दरवर्षी ३ ऑक्टोबर हा दिवस महाराष्ट्र सरकारने मराठी अभिजात भाषा गौरव दिन अर्थात सन्मान दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र सरकारकडून मराठी भाषेला अधिकृतपणे अभिजात भाषा (क्लॉसिकल लँग्वेज) चा दर्जा जाहीर करण्यात आला. मराठी भाषेला अभिजात दर्जा देताना मराठी भाषेची गेल्या सुमारे २५०० वर्षाची परंपरा गृहीत धरण्यात आली. मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी, भाषेचे संवर्धन होण्यासाठी, जनमानसामध्ये मराठी भाषेच्या अभिजाततेची ओळख व्हावी, अभिजात मराठी भाषेसंदर्भातील संशोधन, जनजागृती जास्तीत जास्त व्हावी याकरीता प्रतिवर्षी ३ ऑक्टोबरला अभिजात मराठी भाषा दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे मराठी भाषा विभागाने शासन अध्यादेशाद्वारे जारी केले. हा ऐतिहासिक क्षण आणि मराठी भाषेचा गौरव करण्यासाठी हा दिवस निवडण्यात आला आहे. अभिजात भाषा हा वैशिष्ट्यपूर्ण भाषेला भारत सरकारद्वारे दिला जाणारा एक दर्जा आहे. केंद्र सरकारने अभिजात भाषेचे निकष ठरवलेले आहेत. भाषा प्राचीन आणि साहित्य श्रेष्ठ असावे. भाषेचे वय दीड ते अडीच हजार वर्षांचे असावे. भाषेला स्वतःचे स्वयंभूपण असावेत. प्राचीन भाषा आणि तिचे आधुनिक रूप यांचा गाभा कायम असावा. हा दर्जा ज्या भाषांना दिला जातो त्या भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारकडून त्या-त्या राज्याला भरीव अनुदान मिळते. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी प्रयत्न सुरू होते. यासाठी महाराष्ट्र राज्य शासन तर्फे रंगनाथ पठारे यांच्या नेतृत्वाखाली एक समिती नेमून ५०० पानांचा अहवाल भारतीय केंद्र सरकारकडे सादर केला होता. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्र राज्यातील विधानसभा निवडणुकीकरीता केंद्र सरकारने राज ठाकरेंच्या पुढाकाराने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला. मराठी भाषा मुळातच अभिजात होती. तिला अभिजात दर्जा मिळावा यासाठी महाराष्ट्राने सनदशीर मार्गाने प्रयत्न केले. गेले दशकभर यासाठी अनेक स्तरांवर प्रयत्न करण्यात येत होते. या पार्श्वभूमीवर मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याचा तमाम मराठी भाषिकांना आनंद झाला आहे. तसंच मराठी भाषेच्या विकासासाठी आणखी ऊर्जा, प्रेरणा मिळाली आहे. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने अभिजात भाषेतील स्कॉलर्ससाठी दरवर्षी दोन आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळतात, अभिजात भाषेसाठी सेंटर ऑफ एक्सलंन्स फॉर स्टडिज स्थापन करण्यात येतं, प्रत्येक विद्यापीठात अभिजात भाषेसाठी एक अध्यासन केंद्र स्थापन केलं जातं. प्राचीन ग्रंथाचे डिजिटलाझेशन, भाषांतर, प्रकाशन आणि अर्काईव्हिंग (संग्रहण) क्षेत्रात तरुणांसाठी रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतात.

मराठी’ भाषा ही आपली जननी आहे. या भाषेला समृद्ध इतिहास व परंपरा लाभलेली आहे. याच भाषेतून आपण आपल्या भावना, विचार प्रभावीपणे व्यक्त करीत आहोत आणि म्हणूनच काळाच्या ओघात भाषेच्या स्वरूपात कधीही बदल न होणारी, अलौकिक सौंदर्य लाभलेली कुलीन, सुसंस्कृत, उच्च, सभ्य व चिरकाल टिकणारी भाषा म्हणून आपण अभिजात भाषेला म्हणजेच पर्यायाने मराठी भाषेला मनापासून मानतो. आपले राज्य महाराष्ट्र. आपल्या राज्याची मातृभाषा, राजभाषा ही मराठी. भाषेला आपण आपली आई म्हणतो. त्या अर्थाने आपली मराठी भाषा आता ३ ऑक्टोबर २०२४ पासून अभिजात भाषा म्हणून गौरविली गेली आहे. अभिजात भाषा म्हणजे चिरकाल टिकणारी व सौंदर्यप्रधान असलेली सुसंस्कृत भाषा होय. असे म्हटले जाते की, इ.स.पू.२०७ मध्ये ब्राम्ही लिपी आणि मराठी भाषेतील शिलालेख सापडला. इ.स.पू. तीनशे वर्षांपूर्वी मराठी भाषा बोलली जात होती. मराठी भाषेत काळानुरूप बदल होत गेले. आद्यकाल, यादवकाल, बहामनीकाल, छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ, इंग्रजांचा काळ आणि पेशवे काळ या दरम्यान मराठी भाषेत वृद्धी झाली.

सर्वप्रथम सातवाहन राजांनी मराठी भाषेचा वापर व्यवहार, प्रशासनात केल्याचा दाखला मिळतो. त्यानंतर यादवांच्या काळात मराठी संस्कृती व भाषा भरभराटीस आली. इ.स.११८८ मध्ये आद्यकवी मुकुंदराज यांनी विवेकसिंधू तर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी इ.स.११९० मध्ये ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहून मराठी भाषेला राजाश्रय मिळवून दिला. इ.स.१९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्वतंत्ररीत्या निर्मिती होऊन मराठी राजभाषा घोषित करण्यात आले. मुकुंदराज, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ, रामदास, श्रीधर, मुक्तेश्वर, मोरोपंत यांच्यासह अनेक कवींना मराठी भाषेचे आद्य कवी मानले जाते. आता ही भाषा जगभरात ७२ देशांमध्ये व भारतातील ३६ राज्यात बोलली जाते. अधिकृत भाषांमध्ये मराठी भाषेला १५ वा क्रमांक मिळाला. सुमारे ११ कोटींहूनही अधिक लोक मराठी भाषा बोलतात. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी मागील अनेक वर्षांपासून प्रयत्न सुरू होते. पण त्यासाठी केंद्र सरकारचे काही निकष ठरलेले होते. जसे-भाषेचा नोंदवलेला इतिहास हा अती प्राचीन स्वरूपाचा म्हणजे १५०० ते २००० वर्षं जुना हवा, प्राचीन साहित्य हवे, जे त्या भाषिकांना मौल्यवान वारसा वाटते, दुस-या भाषा समूहाकडून उसनी न घेतलेली अस्सल साहित्यिक परंपरा हवी, अभिजात भाषा ही आजच्या भाषेपेक्षा निराळी हवी, असे प्रारूप ठरलेले असल्याने त्यानुसार मराठी भाषा ही अभिजातच आहे, यासाठी महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमून एक अभ्यासपूर्ण अहवाल भारतीय केंद्र सरकारकडे सादर केला होता.

प्रारंभी जेव्हा ही भाषा बोलली गेली, तेव्हा महारट्ठी-महरट्ठी-मऱ्हाटी-मराठी असा मराठीचा उच्चार बदलत गेला, असं या अहवालात म्हटलं आहे. महाराष्ट्रीय भाषा ही महाराष्ट्र हा प्रदेश अस्तित्वात येण्याच्या फार पूर्वीपासून प्रचलित होती आणि मराठीचं वय किमान अडीच हजार वर्षं जुनं असल्याचे पुरावे असल्याचेही या अहवालात म्हटलं आहे. त्यानुसार ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा जाहीर करून मराठी भाषेला गौरव मिळवून दिला. भारत सरकारने आतापर्यंत तमिळ, संस्कृत, तेलुगू, कन्नड, मल्याळम, मराठी, बंगाली, पाली, प्राकृत, उडिया आणि आसामी अशा अकरा भाषांना हा अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा दिल्यामुळे आता या भाषांसाठी काही संस्था नव्याने उभारल्या जातील. तसेच या भाषांमधल्या प्रकल्पांना पाठबळ देण्यासाठी आर्थिक तरतूदही केली जाईल. मराठी भाषेसाठी दरवर्षी कोट्यवधी रुपये भरीव अनुदान स्वरूपात दिले जाईल. त्यामुळे मराठीच्या बोलींचा अभ्यास, संशोधन, साहित्यसंग्रह करणे, भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय करणे, प्राचीन ग्रंथ अनुवादित करणे, महाराष्ट्रातील सर्व १२ हजार ग्रंथालयांना सशक्त करणे, मराठीच्या उत्कर्षासाठी काम करणा-या संस्था, व्यक्ती, विद्यार्थी अशा सा-यांना भरीव मदत करणे अगदी सुलभ होईल. त्या अर्थाने मराठी भाषेला लाभलेला हा अभिजात भाषेचा अलंकार निश्चितच गौरवणीय असाच आहे.

एका बाजूला या सगळ्याचा जरी आनंद असला, तरी इतर भारतीय भाषांच्या तुलनेमध्ये मराठी भाषा ही आपल्या शहरात, राज्यात आजही परकीय आहे, दुय्यम स्थानावर आहे असे व्यवहारात वागत असताना जाणवते. आपल्या शहरात, राज्यात येऊन वर्षानुवर्ष राहणारे बॉलीवूडमधील कलाकार असतील, कॉर्पोरेटमधील अधिकारी असतील, नोकरी करणारे व्यावसायिक असतील, त्यांना आजही मराठी भाषा येत नाही, मराठी भाषा बोलली पाहिजे, असे वाटत नाही. आपल्या मुलांना मराठी सरकारी शाळेत दाखल करणे आणि त्या शाळांचा दर्जा उत्तम राहील, यासाठी प्रयत्न करणे मराठी पालकांना महत्त्वाचे वाटत नाही. मराठी सिनेमा, नाटक, साहित्य याला फार मोठी परंपरा आहे; परंतु ही परंपरा चढत्या क्रमाने पुढे जात राहावी यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे. तसे घडताना दिसत नाही किंबहुना हा दर्जा ढासळतो आहे, असेच वाटत आहे. मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने केवळ एक दिवस चर्चा करायची आणि एरवी आपली मुले देखील इंग्रजी शाळेत पाठवायची, याला काय म्हणावे? खरे तर आपल्या भाषेतील शब्दांचा वापर आणि जपणूक झाली पाहिजे. तसेच इतर भाषांमधील तंत्रज्ञानाशी संबंधित शब्द हे त्याच्या अर्थासहित समजून घेऊन आपल्या भाषेत त्यासाठी पर्यायी शब्द निर्माण झाले पाहिजेत. यासाठी भाषेवर प्रेम करणा-यांनी जागरूक असायला हवे.

तसा कोणताही प्रयत्न मराठी भाषेच्या संवर्धनाच्या बाबतीत होताना दिसत नाही. मराठी भाषा शिकवणा-या प्राध्यापकांच्या मराठी भाषेचे वाचन आणि शिकवणे याविषयी चिंता करावी, अशी परिस्थिती अलीकडे अनेक महाविद्यालयात अनुभवायला मिळते. म्हणून केवळ मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला याचा आनंद व्यक्त करणे पुरेसे नाही. आपण सर्वच मराठी माणसांनी जाणीवपूर्वक आपली भाषा ही इतर भाषिकांनी शिकावी त्यातले ज्ञान, परंपरा, त्यातील शब्द सौंदर्य आणि शब्द संपदा आणि श्रीमंती इतरांनाही आपल्याला अनुभवायला देता यावी.

**सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली,यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७४९८८८५०६१**

# युनायटेड किंगडमच्या ऐक्याला आव्हान : ब्रिटिश साम्राज्यापासून अंतर्गत स्वायत्ततेपर्यंत

एक काळ असा होता की, ‘‘ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य कधीच मावळत नाही’’ असे अभिमानाने म्हटले जात असे. आशिया, आफ्रिका, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि इतर अनेक प्रदेशांमध्ये ब्रिटिश सत्तेचा प्रभाव पसरला होता. भारतासह अनेक देशांवर ब्रिटिश साम्राज्याने दीर्घकाळ राज्य केले. मात्र, इतिहासाचे चक्र कायम एकाच दिशेने फिरत नाही. विसाव्या शतकात वसाहतवादाचा अंत झाला आणि ब्रिटिश साम्राज्याचे स्वरूप झपाट्याने बदलले. आज ब्रिटनसमोर बाहेरील साम्राज्य टिकवण्याचे नव्हे, तर स्वतःच्या संघराज्यीय रचनेतील ऐक्य टिकवण्याचे आव्हान उभे आहे.

**स्वातंत्र्याच्या मागण्यांना पुन्हा जोर**

युनायटेड किंगडममध्ये स्कॉटलंड, वेल्स आणि उत्तर आयर्लंड या घटकांना विविध पातळ्यांवर स्वायत्त अधिकार आहेत. मात्र, गेल्या काही वर्षांत विशेषतः स्कॉटलंडमध्ये पूर्ण स्वातंत्र्याची मागणी सातत्याने चर्चेत आहे. वेल्समध्येही अधिक स्वायत्ततेचा आणि घटनात्मक अधिकारांचा प्रश्न पुढे आला आहे. उत्तर आयर्लंडमध्ये मात्र प्रश्नाचा संदर्भ वेगळा असून तो आयर्लंडच्या पुनर्एकीकरणाशी संबंधित आहे.

सप्टेंबर २०२६ मध्ये स्कॉटलंड, वेल्स आणि उत्तर आयर्लंडशी संबंधित प्रमुख राजकीय नेत्यांनी घटनात्मक भवितव्य आणि स्वतंत्रतेच्या प्रश्नावर परस्पर सहकार्य करण्यासाठी करार केला. ही बैठक संबंधित नेत्यांनी त्यांच्या पक्षीय भूमिकेतून घेतली होती; त्यामुळे त्याला तिन्ही घटक देशांनी अधिकृतपणे स्वातंत्र्य घोषित केल्याचा अर्थ लावणे योग्य ठरणार नाही.

**नंतर असंतोषाला नवी धार**

ब्रिटनने २०२० मध्ये युरोपियन युनियनमधून बाहेर पडण्याची प्रक्रिया पूर्ण केली. नंतर केंद्र आणि घटक राष्ट्रांमधील संबंध, आर्थिक धोरणे आणि राजकीय अधिकार यावर नव्याने चर्चा सुरू झाली. विशेषतः स्कॉटलंडमध्ये युरोपियन युनियनमध्ये राहण्याच्या भूमिकेला महत्त्व होते. त्यामुळे च्या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्याच्या मागणीला नवी राजकीय धार मिळाल्याचे दिसते.

तथापि, घटक राष्ट्रांना केंद्राकडून निधी मिळत नाही, असे चित्र पूर्णपणे अचूक नाही. अंतर्गत स्कॉटलंड, वेल्स आणि उत्तर आयर्लंडच्या विकेंद्रित सरकारांना निधी दिला जातो. याशिवाय काही कर व खर्चाचे अधिकारही या प्रशासनांकडे सोपवण्यात आले आहेत. २०२६ च्या ब्रिटिश सरकारच्या मध्येही या तिन्ही प्रशासनांसाठी मोठ्या प्रमाणात अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली आहे.

म्हणूनच या प्रश्नाकडे केवळ ‘‘केंद्र पैसा देत नाही’’ या दृष्टिकोनातून न पाहता आर्थिक अधिकार, करसंकलन, संसाधनांचे वाटप, स्थानिक निर्णयक्षमता आणि राजकीय प्रतिनिधित्व या सर्व मुद्द्यांच्या संदर्भात पाहणे आवश्यक आहे.

**ऐतिहासिक संघर्षाची पार्श्वभूमी**

स्कॉटलंड आणि इंग्लंड यांच्यातील राजकीय एकीकरण १७०७ च्या नंतर झाले. वेल्सचे इंग्लंडशी राजकीय एकत्रीकरण त्यापूर्वीच झाले होते. उत्तर आयर्लंडचा प्रश्न मात्र अधिक गुंतागुंतीचा आहे. आयर्लंडच्या विभाजनानंतर १९२१-२२ पासून उत्तर आयर्लंड युनायटेड किंगडमचा भाग राहिले.

आयर्लंडच्या स्वातंत्र्याच्या संघर्षाला हिंसक वळणही मिळाले. १९७९ मध्ये ब्रिटिश राजघराण्यातील सदस्य आणि भारताचे शेवटचे व्हाइसरॉय लॉर्ड लुईस माउंटबॅटन यांची आयर्लंडमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटात हत्या करण्यात आली. या हल्ल्याची जबाबदारी ने स्वीकारली होती. त्यामुळे या घटनेचा उल्लेख करताना ‘‘आयरिश बंडखोर’’ एवढ्या व्यापक शब्दाऐवजी संबंधित संघटनेचा संदर्भ देणे अधिक अचूक ठरते.

**ब्रिटिश अर्थव्यवस्थेचे बदलते चित्र**

ब्रिटन आजही जगातील महत्त्वाच्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. त्यामुळे ब्रिटिश अर्थव्यवस्था ‘‘कमकुवत झाली’’ असे सरसकट म्हणण्याऐवजी, तिच्यासमोर आर्थिक वाढ, महागाई, सार्वजनिक वित्त आणि उत्पादकतेशी संबंधित आव्हाने आहेत, असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. च्या २०२६ च्या अंदाजानुसार ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेची वाढ २०२६ मध्ये सुमारे १ टक्के राहण्याचा अंदाज आहे. त्याच वेळी भारताच्या २०२६ मधील वास्तविक वाढीचा चा अंदाज ६.४ टक्के आहे. मात्र, या वाढीच्या दरांची तुलना करताना दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्थेचा आकार, लोकसंख्या आणि विकासाची पातळी वेगळी आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

**ऐक्य टिकवण्याचे आव्हान**

आजचा प्रश्न ब्रिटिश साम्राज्याचा राहिलेला नाही; प्रश्न आहे तो युनायटेड किंगडमच्या भविष्यातील घटनात्मक रचनेचा. स्कॉटलंडमध्ये दुसऱ्या स्वातंत्र्य सार्वमताची मागणी, वेल्समध्ये अधिक अधिकारांची मागणी आणि उत्तर आयर्लंडमध्ये आयरिश एकीकरणाचा प्रश्न यामुळे समोरील घटनात्मक आव्हान निश्चितच गंभीर झाले आहे. मात्र, युनायटेड किंगडमची फाळणी अटळ आहे, असा निष्कर्ष सध्या काढणे घाईचे ठरेल. उदाहरणार्थ, ऑक्टोबर २०२६ मधील च्या --नुसार उत्तर आयर्लंडमध्ये ४८ टक्के लोक ब्रिटनमध्ये राहण्याच्या बाजूने होते, तर ३५ टक्के लोक संयुक्त आयर्लंडच्या बाजूने होते आणि १७ टक्के अनिश्चित होते. त्यामुळे जनमतही एकसंध नाही. इतिहासाची विडंबना मात्र लक्षवेधी आहे. एकेकाळी जगाच्या अनेक भागांवर सत्ता गाजवणाऱ्या ब्रिटनसमोर आज स्वतःच्या संघराज्यीय रचनेतील विविध घटकांच्या आकांक्षा समजून घेण्याचे आव्हान आहे. केंद्र आणि घटक राष्ट्रांमधील विश्वास, आर्थिक न्याय, अधिक स्वायत्तता आणि लोकशाही मार्गाने घटनात्मक प्रश्नांची सोडवणूक यावर युनायटेड किंगडमचे भवितव्य मोठ्या प्रमाणात अवलंबून राहणार आहे. साम्राज्याची ताकद टिकवण्यापेक्षा आज ऐक्य टिकवण्यासाठी संवाद आणि परस्पर विश्वास अधिक महत्त्वाचा ठरणार आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# ACE Co-operative Bank ला ‘बेस्ट बँक अवॉर्ड’




**मुंबई - रवींद्र मालुसरे**

एअर इंडिया मधील कर्मचाऱ्यांच्या सुविधांसाठी निर्माण झालेल्या ACE Co-operative Bank Ltd. ला आर्थिक वर्ष २०२५२६ साठी ‘‘पगारदार बँक श्रेणी बेस्ट बँक अवॉर्ड’’ हा मानाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि. यांच्या माध्यमातून प्रदान करण्यात आलेल्या या पुरस्कारामुळे बँकेच्या कामगिरीबद्दल आनंद व्यक्त करण्यात येत असून, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या संचालक पॅनेलचे निर्विवाद वर्चस्व असलेल्या बँकेच्या या यशाबद्दल .बँकेच्या संचालक मंडळासह अधिकारी, कर्मचारी आणि संबंधित सर्व घटकांचे अभिनंदन करण्यात येत आहे. ACE Co-operative Bank Ltd ला मिळालेला हा पुरस्कार बँकेच्या कार्यपद्धतीतील सातत्य, प्रगती आणि सामूहिक प्रयत्नांची दखल म्हणून पाहिला जात आहे. बँकेच्या विविध स्तरांवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या योगदानामुळे हे यश साध्य झाल्याचे त्याचप्रमाणे एअर कॉर्पोरेशन एम्प्लॉईज बँकेच्या संचालक मंडळाने बँकेच्या कामकाजात पगारदार कर्मचाऱ्यांच्या हिताच्या विविध बाबींना महत्त्व दिले जात असल्याचे बँकेचे अध्यक्ष श्री राजेश भागवत यांनी सांगितले. दरम्यान, एअर इंडिया स्थानिक लोकाधिकार समितीच्या माध्यमातून एअर इंडियातील पगारदार कर्मचाऱ्यांच्या एअर कॉर्पोरेशन एम्प्लॉईज बँकेशी संबंधित कामकाजाचा उल्लेखही या निमित्ताने करण्यात आला आहे.

शिवसेना पक्षप्रमुख मा. श्री. उद्धवसाहेब ठाकरे यांच्या सूचनेनुसार तसेच स्थानिय लोकाधिकार समितीचे अध्यक्ष मा. श्री. अनिल देसाई आणि सरचिटणीस मा. श्री. प्रदीप मयेकर यांच्या मार्गदर्शनाखाली समितीच्या माध्यमातून बँकेद्वारे विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे अध्यक्षांकडून सांगण्यात आले. यावेळी बँकेचे संचालक राजश्री पाटील,कार्यकारी सीईओ वर्षा पटेल, बँक कर्मचारी सुचित्रा म्हात्रे, राजेंद्र पारकर अध्यक्ष राजेश भागवत, उपाध्यक्ष नीलेश लांजेकर, बँकेचे संचालक संतोष मोरे, उमेश सानप,माजी सीईओ दिलीप कान्हेरे, बँक संचालक संदीप जाधव, ऋषेकेश बांडुक उपस्थित होते. ‘‘पगारदार बँक श्रेणी बेस्ट बँक अवॉर्ड’’ मिळाल्याने ACE Co-operative Bank Ltd च्या कार्याची अधिकृत पातळीवर दखल घेतली गेल्याची भावना याप्रसंगी सर्वांनीच व्यक्त केली. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी तसेच बँकेशी संबंधित सर्व घटकांचे सर्व कामगारांकडून मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून, बँकेच्या उज्वल आणि यशस्वी भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# दुष्काळाची झळ शेतकरी, सामान्यांना!

फार वर्षांनंतर म्हणजे १९७२ च्या दुष्काळाची तीव्रता बहुतेक संपूर्ण महाराष्ट्रात निर्माण झाली आहे.असे निरिक्षणातून आलेल्या अहवालातून स्पष्ट होत आहे.दुष्काळाला तोंड देणं सरकारची मोठी कसोटी आहे.सणं वार, समारंभ येत आहेत.नुकताच गणेशोत्सव झाला,पुढे नवरात्रोत्सव, दसरा, दिवाळी येणार आहेत ते साधेपणाने साजरे करण्याचे आवाहन मुख्यमंत्री महोदयांनी केले आहे.महाराष्ट्र राज्यावर अकरा लाख कोटींचे कर्ज असल्याचे बोलले जाते.सरकार आपल्या कामाच्या जाहिरातींवर जो खर्च करते .तो जनतेच्या कराच्या रूपाने आलेल्या पैशातून खर्च करते.चांगल्या कामाची कधीच जाहिरात करावी लागत नाही.

आमदार, खासदार, मंत्री,उप मुख्यमंत्री, मुख्यमंत्री यांच्या खर्चात पन्नास टक्के कपात करा.सरकारने दुष्काळ निवारणासाठी घेतलेल्या निर्णयांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम पत्रकार करतील.महाराष्ट्रात पाऊस कुठे पडला तर कुठे पडलाच नाही.त्यामुळे शेतकरी शेतीची कामे पूर्ण करु शकला नाही.कधी ओला दुष्काळ तर कधी सुका दुष्काळ.निसर्ग बदलतोय, पर्यावरणाचा समतोल बिघडतो आहे.हवामान खात्याचेही अंदाज चुकतात अशा वेळी शेतकऱ्यांनी शेती कशी करावी.सामान्य नागरिक विविध करांच्या ओझ्याने आधींच वाकला आहे.तेव्हा येणाऱ्या सणं वार, लग्न सराईत किती झळ सोसावी लागेल हे सांगणे कठीण आहे.

**महादेव गोळवसकर**
**मुंबई ,**
**९८६९४७६२०९**

# श्रीमद जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणेने २५५ वे मरणोत्तर देहदान व २२२ वे नेत्रदान संपन्न

**हसनाबाद - प्रतिनिधी**



श्रीमद जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणेने अनेक सेवाभावी उपक्रम राबवले जातात त्यामध्ये वैद्यकीय, सामाजिक, व्यसनमुक्ती, रोजगार, असे अनेक उपक्रम राबवले जातात.यामध्ये आपण समाजाचे काहीतरी देणं लागते या उदात्त भावनेने मरावे परी कीर्तिरूपे उरावे या उक्तीप्रमाणे समाजाच्या ऋणातून उतराई होण्यासाठी श्रीमद जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त नरेंद्राचार्यजींनी आपल्या सर्व भक्त परिवारांना आवाहन केले होते की आपण आपले स्वकीय , नातेवाईक, मित्रपरिवार, मृत पावले असता त्यांचे देहाचे दान करून जवळच्या वैद्यकीय महाविद्यालयात सुपूर्द करावे जेणेकरून वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेणारे भावी डॉक्टर्स यांना प्रात्यक्षिकासाठी प्रत्यक्ष या देहाचा उपयोग होईल व जेणेकरून समाजासाठी निष्णात डॉक्टर तयार होतील ज्यांच्या हातून या समाजाची सेवा घडेल या उपक्रमांतर्गत भक्त परिवारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद म्हणून ५६ हजाराहून अधिक भक्तगणांनी आपले संकल्प पत्र संस्थांनास भरून दिले. तसेच आजपर्यंत २५५ हून अधिक जणांनी आपल्या नातेवाईकांचे देह वैद्यकीय महाविद्यालयास सुपूर्द केले आहे .याच उपक्रमामध्ये एक पुष्प म्हणून जालना जिल्हा सेवा समितीच्या वतीने भोकरदन तालुक्यातील कै.जयराम भाऊराव सोनवणे यांचे मरणोत्तर देहदान शासकीय वैद्यकीय महाविद्यालय जालना व गणपती नेत्रालय जालना येथे २२२ वे नेत्रदान करण्यात आले.

युवा आदर्श | जालना | शनिवार दि. ०३ ऑक्टोबर २०२६ | E-mail- yuva.aadarsh@gmail.com


# जे ई इस मध्ये राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेला सुरवात

**जालना - प्रतिनिधी**

येथील जे ई इस महाविद्यालयात ''इंडियन राउंड'' धनुर्विद्या स्पर्धेला मान्यवरांच्या हस्ते थाटात सुरवात झाली.भीष्म आर्चरी असोसीएशन आणी जे ई इस महाविद्यालय तसेच गुरु द्रोणा आर्चरी एकेडमी,जालना फर्स्ट व रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य वरिष्ठ धनुर्विद्या स्पर्धेचा आजचा पहिला दिवस होता.इंडियन राउंड राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेत १५२ मुले व ९४ मुली असे एकूण २४६ खेळाडु राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी झाले.



स्पर्धेचा शुभारंभ संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तमजी बगडिया, सचिव श्रीनिवासजी भक्कड़,व उपाध्यक्ष फुलचंदजी भक्कड, महेश सारस्वत जिल्हाध्यक्ष धनुर्विद्या संघटना, सुनील खरे, धनुर्विद्या संघटनेचे जिल्हा सचिव प्रकाश दूसेजा, सचिन टेकुर, सुमित अमलेकर,विशाल इंगले आदिंच्या हस्ते झाला.तर महाराष्ट्र धनुर्विद्या संघटना चे महासचिव प्रमोद चांदुरकर व महाराष्ट्र धनुर्विद्या संघटने चे अध्यक्ष प्रशांत देशपांडे यांचे नेतृव लाभले. प्राचार्य गणेश अग्निहोत्री,उप प्राचार्य उमेश मोगले, प्रा.हेमंत वर्मा, रजिस्ट्रार बाबाजी सोळुंके, प्रा.किशोर बरकायलू, प्रा.राजेंद्र सोनवने, क्रीड़ा शिक्षक राहुल सारस्वत, सचिन निसर्गन यांची उपस्थिति होती.

मुलिंच्या गटात अकोला येथील स्पर्धक कु.पूजा राजगुरे ६३० गुण घेऊन राज्यात प्रथम आली.दूसरा क्रमांक कु.सानवी घाडगे ६२८ गुण घेऊन द्वितीय आली.पुणे येथील समृद्धि तायडे ६२७ गुण घेऊन तीसरी आली. नाशिक ची जिज्ञासा भारंबे ६२३ गुण घेऊन चौथा क्रमांक मिळवला.जालना ची आकांक्षा घाडगे हिने ६१५ गुण घेऊन पाचवे स्थान मिळवले.व अमरावती ची श्रावणी पवार हिने ६१५ गुण घेऊन सहावे स्थान पटकावले.वरील पहिल्या चार क्रीड़ापटू यांची निवड पुढे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी झाली आहे.

मुलांच्या गटात अमरावती येथील शौर्य चव्हाण ६६४ गुण घेऊन राज्यात प्रथम येण्याचा बहुमान मिळवला.सोलापुर येथील शिवतेज पिंगले ६५० गुण घेऊन द्वितीय येण्याचा बहुमान मिळवला.बुलढाणा येथील राज भारसाखले ६४८ गुण घेऊन तीसरा क्रमांक पटकावला.नंदुरबार चा पवन जाधव ६४२ गुण घेऊन चौथे स्थान मिळवले.कोल्हापुर चा यश पाटिल ६३६ गुण घेऊन पांचवा आला.तर अमरावती येथील ऋषिकेश चांदुरकर याने ६३५ अंक प्राप्त करुण सहावा येण्याचा बहुमान मिळवला.वरील ६ पैकी ४ स्पर्धकांची निवड राष्ट्रीय स्तरावरील धनुर्विद्या स्पर्धेसाठी झाली आहे.

# 'आदिशक्ती नौ रूप, एक स्वरूप'चा शनिवारी जालन्यात जागर

## अग्रशक्ती बहुमंडल २०२६ तर्फे भव्य सांस्कृतिक कार्यक्रम; देवीच्या नऊ स्वरूपांतून शक्ती, ममता, साहस आणि नारीशक्तीचे दर्शन

**जालना । प्रतिनिधी**

अग्रवाल समाज जालना अंतर्गत अग्रशक्ती बहुमंडल २०२६ तर्फे भारतीय संस्कृती, भक्ती आणि नारीशक्तीचा सुरेख संगम घडविणाऱ्या 'आदिशक्ती नौ रूप, एक स्वरूप' या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, ३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता महाराजा अग्रसेन फाउंडेशन येथे हा कार्यक्रम उत्साहात पार पडणार आहे.

नवरात्रीच्या उत्सवी वातावरणाला सांस्कृतिक आणि आध्यात्मिक रंग देणाऱ्या या कार्यक्रमात आदिशक्तीच्या नऊ




दिव्य स्वरूपांचे विशेष सादरीकरण करण्यात येणार आहे. देवीच्या विविध रूपांमधून प्रकटणारी शक्ती, ममता, करुणा, साहस, आत्मविश्वास आणि दिव्यतेचे दर्शन कलाविष्काराच्या माध्यमातून उपस्थितांना घडणार आहे. भारतीय संस्कृतीमध्ये आदिशक्तीला विशेष स्थान असून, देवीच्या विविध रूपांमध्ये स्त्रीशक्तीचे विविध पैलू प्रतिबिंबित होतात. याच संकल्पनेवर आधारित 'आदिशक्ती नौ रूप, एक स्वरूप' या कार्यक्रमाची संकल्पना साकारण्यात आली आहे.

देवीचे प्रत्येक रूप हे वेगळे असले तरी त्यामागील शक्तितत्त्व एकच आहे. या विचाराला केंद्रस्थानी ठेवून कार्यक्रमाची *(पान २ वर)*

# परतूर पोलिसांची जुगार अड्ड्यावर धाड; ५ जणांना ताब्यात घेत रु. ५,०५,७४०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त

**परतूर - प्रतिनिधी**

परतूर पोलीस ठाणे हद्दीतील मौजे सातोना खुर्द शिवारातील अफसर शेख यांच्या केळीच्या शेतातील लिंबाच्या झाडाखाली सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर परतूर पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली. दि. ३०/०९/२०२६ रोजी रात्री सुमारे २३.३० वाजता मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक कमलदाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने सदर ठिकाणी अचानक छापा टाकला. त्यावेळी काही इसम गोलाकार बसून पत्त्यावर पैसे लावून ''झन्ना मन्ना'' जुगाराचा खेळ खेळताना व खेळविताना आढळून आले. कारवाईदरम्यान खालील ५ इसमांना ताब्यात घेण्यात आले. अनिल बापुराव सूर्यवंशी, वय ३५ वर्षे, रा. सातोना खुर्द, ता. परतूर प्रल्हाद शिवाजी साठे, वय २६ वर्षे, रा. सातोना खुर्द, ता. परतूर भिमा संपतराव आकात, वय ४० वर्षे, रा. सातोना खुर्द, ता. परतूर मुस्ताकअल्लाबकश शेख, वय ३२ वर्षे, रा. सातोना खुर्द, ता. परतूरअंकुश सदाशिव आकात, वय ३८ वर्षे, रा. सातोना खुर्द, ता. परतूर कारवाईमध्ये रोख रक्कम, पत्त्यांचे कॅट, मोबाईल फोन तसेच जुगारासाठी वापरण्यात आलेल्या विविध मोटारसायकली व स्कूटी असा एकूण रु. ५,०५,७४०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर कारवाईदरम्यान पोलिसांना पाहून पाच इसम घटनास्थळावरून पळून गेले असून त्यांची नावे व पत्ते अद्याप समजू शकलेले नाहीत. त्यांचा शोध घेण्यात येत आहे. याप्रकरणी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अन्वये परतूर पोलीस ठाण्यात कायदेशीर कारवाई करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

कारवाईतील पोलीस पथक : परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक कमलदाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ अशोक गाढवे,पोकॉ गोविंद पवार, विजय जाधव, ज्ञानेश्वर वाघ, दशरथ गोपनवाड, आकाश राऊत,अतुल खंदारे यांनी ही कारवाई केली.

# ए. एम. डी. इंग्लिश स्कूल अँड कॉलेज, सोमनाथ येथे महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी

**सोमनाथ - प्रतिनिधी**

ए. एम. डी. इंग्लिश स्कूल अँड कॉलेज, सोमनाथ येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रा. दिलीप अर्जुने यांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक निशांत लालझरे , ॲडमिन ज्योती बगीनवाल यांची प्रमुख उपस्थिती होती.




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अविनाश कांबळे यांनी केले. . अभिजीत भंडारे यांनी विद्यार्थ्यांना महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा व स्वच्छतेच्या विचारांसह लाल बहादूर शास्त्री यांच्या साधेपणा, प्रामाणिकपणा व देशसेवेच्या कार्याविषयी मार्गदर्शन केले.

यानंतर संतोष कांबळे यांनी सामूहिक प्रार्थना 'रघुपती राघव राजा राम' घेतली. त्यांनी स्वच्छतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगत शालेय परिसरात स्वच्छता अभियान राबविले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी स्वच्छता, शिस्त आणि सामाजिक जबाबदारीचा संदेश दिला. या संपूर्ण कार्यक्रमास संस्थेच्या सचिव . डॉ. मंगला दिलीप अर्जुने यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.'स्वच्छता, सत्य, अहिंसा आणि देशसेवा' या मूल्यांचा संदेश देत कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांना लायन्स क्लबतर्फे अभिवादन

**जालना - प्रतिनिधी**

राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त लायन्स क्लब ऑफ जालनातर्फे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी लायन्स क्लबचे अध्यक्ष डॉ. गिरीश पाकणीकर, सचिव गणेश कामड, रीजन चेअरपर्सन जयश्री लड्ढा, प्रांत पीआरओ अतुल लड्ढा, प्रांत कॅबिनेट सदस्य अरुण मित्तल, द्वारकादास मुंदडा, राजेश खिस्ते, नारायणराव वानखेडे यांच्यासह महानगरपालिकेच्या प्रमिला मोरे, आनंद त्रिभुवन, गणेश बत्तीन तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.यावेळी उपस्थित मान्यवरांनी महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा व स्वच्छतेच्या विचारांबरोबरच लालबहादूर शास्त्री यांच्या साधेपणा, प्रामाणिकपणा, देशसेवा आणि 'जय जवान, जय किसान' या विचारांचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले.

महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या विचारांचा प्रसार व्हावा आणि त्यांच्या कार्याची समाजाला प्रेरणा मिळावी, या उद्देशाने जयंतीनिमित्त संपूर्ण आठवडाभर विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमास लायन्स क्लबचे सदस्य, महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी तसेच विविध पदाधिकारी उपस्थित होते.

# श्रीराम वाचनालयात महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरी



**जालना - प्रतिनिधी**

महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती जालना येथील ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालयात दि.०२/१०/२०२६ रोजी साजरी करण्यात आली. ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालयाचे ग्रंथपाल शाम शेलगांवकर व दैनिक कृष्णनितीचे प्रतिनिधी गौतम गाडेकर यांच्या हस्ते महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी दिलीप वराडे, श्रावस्ती गाडेकर, राजनंदणी गाडेकर, आशिष उबाळे, रामकृष्ण खैरे, विजय खिल्लारे, अश्विनी भाले, कीर्ती पुराणिक,शैलेंद्र बदनापूरकर यासह वाचक वर्ग उपस्थित होता.

# जालना समाजकार्य महाविद्यालयामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना अभिवादन



**जालना - प्रतिनिधी**

दि २ ऑक्टोबर २०२६ रोजी कर्मवीर प्रतिष्ठान संचलित जालना समाजकार्य महाविद्यालयामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना जयंती च्या निमित्ताने सांस्कृतिक विभागाच्या वतीने अभिवादन करण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजकुमार म्हस्के हे उपस्थित होते यावेळी डॉ. राजकुमार म्हस्के यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. यावेळी उप प्राचार्य डॉ. मधू खोब्रागडे, सांस्कृतिक समन्वयक प्रा. डॉ. दिपक बुत्तरे, डॉ. सुधीर गायकवाड, डॉ. नरसिंग पवार, डॉ. मीना बोर्डे,दत्ता रेवले, सुमंत माने, शिवाजी भुतेकर,संजय गाडे आदि उपस्थित होते.

# समर्थ अकॅडमीत गांधी जयंती; स्वच्छतेचा दिला संदेश



**जालना - प्रतिनिधी**

माय भारत, जालना, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार आणि समर्थ करिअर अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महात्मा गांधी यांच्या स्वच्छता, शिस्त आणि सामाजिक बांधिलकीच्या विचारांना उजाळा देत यानिमित्ताने अकॅडमी परिसरात स्वच्छता मोहीमही राबविण्यात आली. सदर कार्यक्रमाचे आयोजन माय भारत, जालना येथील जिल्हा युवा अधिकारी मयुरकुमार गोरमे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमास समर्थ करिअर अकॅडमीच्या संचालिका संध्या आनंदे, प्रमुख मार्गदर्शक सौरभ आनंदे, किरण आनंदे आणि माऊली धावडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीस महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अकॅडमीच्या संचालिका संध्या आनंदे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करताना महात्मा गांधी यांच्या जीवनकार्याचा आणि त्यांच्या विचारांचा विद्यार्थ्यांनी आपल्या दैनंदिन जीवनात अंगीकार करण्याचे आवाहन केले.

त्यानंतर प्रमुख मार्गदर्शक *(पान २ वर)*

# मत्स्योदरी अभियांत्रिकीमध्ये स्वच्छता अभियान




**जालना - प्रतिनिधी**

शहरातील मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, जालना येथील राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन विभागाच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालय परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

महात्मा गांधी यांनी दिलेल्या स्वच्छतेच्या संदेशाचा प्रसार व्हावा तसेच विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने या स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

या अभियानात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार, उपप्राचार्य प्रा. आर. एल. करवंदे, तंत्रनिकेतन प्रभारी प्रा. ए. पी. दवणे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. नंदकिशोर वाघ, प्रा. सूरज लोहकरे, महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक समन्वयक, प्राध्यापक तसेच विद्यार्थी स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले. यावेळी महाविद्यालय परिसरातील विविध ठिकाणी स्वच्छता करण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवण्याचा संदेश दिला.

यावेळी प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार यांनी ''स्वच्छता ही केवळ एका दिवसापुरती मर्यादित न राहता ती प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनली पाहिजे,'' असे सांगत विद्यार्थ्यांना स्वच्छतेची सवय अंगीकारण्याचे आवाहन केले.

# गांधी जयंतीनिमित्त भास्कर दानवेंचा ई-बसने प्रवास; ड्रायव्हर आणि प्रवाशांशी साधला संवाद!



**जालना - प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धन आणि प्रदूषणमुक्त वाहतुकीचा संदेश देण्यासाठी, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून भाजप महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे यांनी आज जालना ते छत्रपती संभाजीनगर असा ई-बसने प्रवास केला. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी स्वतःपासून सुरुवात करण्याच्या उद्देशाने त्यांनी दर महिन्याला एकदा सार्वजनिक वाहनातून प्रवास करण्याचा संकल्प यावेळी जाहीर केला. प्रवासादरम्यान भास्कर आबा दानवे यांनी ई-बसच्या ड्रायव्हरशी (चालक) विशेष संवाद साधला. ई-बस चालवतानाचा अनुभव, बसचे तंत्रज्ञान, चार्जिंग व्यवस्था आणि प्रवाशांचा मिळणारा प्रतिसाद याविषयी त्यांनी ड्रायव्हरकडून माहिती जाणून घेतली. तसेच बसमधील सामान्य प्रवाशांशीही संवाद साधून त्यांच्या अडचणी व प्रवासाबाबतच्या प्रतिक्रिया त्यांनी ऐकून घेतल्या. याप्रसंगी बोलताना ते म्हणाले, ''ई-बसचा वाढता वापर हे स्वच्छ आणि हरित भविष्याच्या दृष्टीने टाकलेले एक सकारात्मक पाऊल आहे. यामुळे *(पान २ वर)*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.